## दिनाक २३.१२.२०१४ रोजीचे आरोग्य समिती सभेचे इतिवृत्त

आरोग्य समितीची सभा दिनांक २३/१२/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता मा श्री.नरेंद्रजी केशवराव ठाकरे सभापती आरोग्य व शिक्षण समिती यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेस खालील सन्मा.सदस्य व अधिकारी,कर्मचारी उपस्थित होते.

—: सर्व श्री. सन्माननीय :—

| अक्रं | उपस्थित सर्व सन्मा सदस्य यांची नांवे | पद |
|---|---|---|
| १ | मा.श्री.नरेंद्रजी केशवराव ठाकरे | सभापती |
| २ | सन्मा.सौ.ज्योतीताई जि.ठेंगे | सदस्य |
| ३ | सन्मा.श्री.पंढरीभाउ हरिभाउ सिंहे | सदस्य |
| ४ | सन्मा.प्रविण बाबारावजी उईके | सदस्य |
| ५ | सन्मा.श्री.शिवशंकर श्रावण पांढरे | सदस्य |
| ६ | सन्मा.सौ.सुलोचनाताई मो.भोयर | सदस्य |
| ७ | सन्मा.सौ.प्राजक्ताताई नि.मानकर | सदस्य |
| ८ | सन्मा.श्री.प्रभाकर रा.उईके | सदस्य |
| ९ | डॉ. डि.टि.रणमले | सचिव तथा अति जिआअ |

—: अधिकारी व निमंत्रीत:—

| अक्रं | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ.डी.डी.भगत | सहा.संचालक (कुष्टरोग) यवतमाळ |
| २ | डॉ.रविंद्र पांडे | निवासी वै.अ सा.रू.यवतमाळ |
| ३ | डॉ.एस.एम.तरोडेकर | जिल्हा हिवताप अधिकारी |
| ४ | डॉ.मोहन खडतकर | ता.आ.अ बाभुळगांव |
| ५ | डॉ.अविनाश देशमुख | ता.आ.अ कळंब |
| ६ | डॉ.विजय उमरे | ता.आ.अ घांटजी |
| ७ | डॉ.आशिष पवार | ता.आ.अ पुसद |
| ८ | डॉ.एस.एम.मडावी | ता.आ.अ झरी |
| ९ | डॉ.सि.एस.भोगाडे | ता.आ.अ .दिग्रस |
| १० | डॉ.संजय तोडासे | ता.आ.अ वणी |
| ११ | डॉ.रविंद्र दुर्गे | ता.आ.अ नेर |
| १२ | डॉ.प्रिती लामकासे | ताआअ यवतमाळ |
| १३ | डॉ.विजय गांवंडे | ता.आ.अ मारेगांव |
| १४ | डॉ.पि.एम.तिमेंवार | प्रति.ता.आ.अ पांढरकवडा |
| १५ | श्री.यु.एन.बनकर | प्रति.ता.आ.अ राळेगांव |
| १६ | श्री.बी.डी.बोतंलवार | प्रति.ता.आ.अ उमरखेड |
| १७ | श्री.जे.यु.ढोक | प्रति.ता.आ.अ दारव्हा |
| १८ | श्री.टि.डी.मेश्राम | प्रति.ता.आ.अ महागांव |
| १९ | श्री.आर.आर.माहुरे | प्रति.ता.आ.अ आर्णी |
| २० | श्री.व्हि.टि. खर्चे | उपअभियता.एमएसईडिसी |
| २१ | श्री.जि.एस.भारशंकर | शा.अ.बा.वि.क्रमांक २जि.प |
| २२ | श्री.आर.एल.मशरू | शा.अ बा.वि.क्रमांक १जि.प. |

| | | |
|---|---|---|
| २३ | श्री.एस.एम.सवने | मु.अ.शा.जि.आ.प्रयोगशाळा |
| २४ | श्री.लिलेश साखरवाडे | उपअभियंता बांधकाम एनआरएचएम |
| २५ | श्री.एम.डी.कुळकर्णी | उपअभिंयता.उपविभाग झरी |
| २६ | श्री.अे.अे. धकाते | शा.अ (विद्युत) बा.वि.क्रमांक १जि.प |
| २७ | श्री बी.आर.देवतळे | नेत्रचिकित्सक अधिकारी |
| २८ | डॉ.राहुल मनियार | डि.पी.एम आ.विभाग |
| २९ | श्री.जी.व्ही घंटेवार | प्रति.उपअभियंता वणी |
| ३० | श्री.डि.व्ही.भालेकर | उपअभियंता पांढरकवडा |
| ३१ | श्री.डि.एम. ठाकरे | आ.सहा सभा शाखा |
| ३२ | श्री.व्हि.जी.चहाकर | आ.सहा आ.विभाग |

सर्वप्रथम सचिव तथा अति.जि.आ.अ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.स्वागत केल्यांनतर मा.अध्यक्ष यांचे परवानगीने विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेला सुरूवांत केली.

विषय क्रमांक:–१ :–दिनांक २३.१२. १४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या अहवालांचे वाचन करणे व त्यांस कायम करून मंजुरात प्रदान करणे बाबत

दिनांक २३.१२.२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या अहवालाच्या प्रती सर्व उपस्थित सन्मा सदस्यांना देण्यांत आल्या अहवालांचे वाचन सपल्यानंतर सन्मा.सदस्यांनी खालील मुद्दे उपस्थित करून चर्चा केली व मा.सभापती आरोग्य समिती यांनी,सचिव तथा अति.जि.आ.अ.यांना आवश्यक ते निर्देश दिले. .

१) सन्मा.सौ सुलोचनाताई मो.भोयर :– यांनी आयुर्वेदिक दवाखाना बाणगांव येथील बांधकाम त्वरीत सुरू करण्यांत यावे अशी मागणी केली.

यावर मा.सभापती आरोग्य समिती यांनी सदर बांधकामाचे इस्टिमेंट तयार करून सदर कामाची निवीदा काढण्यांबबत त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश शा.अ बा. वि.क्रमांक २यांना दिले.

तसेच सन्मा. सदस्यांनी ,प्राआकेंद्र माणिकवाडा येथे धर्मशाळा बांधकाम करण्याबाबत कार्यवाही करावी असे सांगीतले.असता शा.अ बा.वि. क्रमांक २ यांनी सदर धर्मशाळा बांधकाम हे मंजुर नसल्यांचे सांगीतले.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी प्राआकेंद्र माणिकवाडा येथे धर्मशाळा बांधकाम करण्याबाबत प्रस्तांव वै.अ व ता.आ.अ नेर यांनी आरोग्य विभागांस तसा प्रस्तांव सादर करण्याबाबत कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

२) सन्मा.श्री.शिवशंकर श्रा.पांढरे :– यांनी उपकेंद्र बिटरगांव (बु) येथील वॉलकम्पांउड पुर्ण करण्यांत यावे.तसेच प्राआकेंद्र थेरडी येथील विद्युत दुरूस्ती /लाईट दुरूस्ती /व इतर विद्युत दुरूस्तीची कार्यवाही करण्यांत यावी. तसेच आदीवासी क्षेत्राअंतर्गत येणा–या प्राआकेंद्र थेरडी बाबत निधी प्राप्त झाला आहे त्याबाबतचा प्रस्तांव त्वरीत शा.अ बा. वि. क्रमांक २यांनी सादर करून पुढील कार्यवाही करण्यांत यावी अशी सभागृहांत मागणी केली. त्याचप्रमाणे मार्लेगांव/पळशी येथील उपकेंद्रांस वॉल कम्पाउंडचे बांधकाम करण्यांत यांवे अशी माहिती सभागृहांत सादर करून कार्यवाहीची मागणी केली.

त्याचप्रमाणे सन्मा. सदस्यांनी प्राआकेंद्र सोनदाभी येथील बांधकामांत वापरलेली निकृष्ठ रेती अद्यापपावेतो काढलेली नाही सदर काम थांबवुन चौकशी करण्यांचे सांगीतले होते.परंतु तसे न करता काम चुाल असल्यांचे सागीतले.सदर कामांची चौकशी केलीच नाही सदर काम हे ज्योत्यापासुनच निकृष्ठ दर्जाचे आहे.अशी सभागृहांत माहिती सादर केली व चौकशीची मागणी करून चौकशी अहवाल सादर करण्यांत यावे असे सांगीतले.

तसेच सन्मा. सौ.ज्योतीताई जि.ठेंगे यांनी सदर प्रकरणी चौकशीची प्रक्रिया पुर्ण होण्यांचे अगोदरच हया कामांचे देयक सुध्दा अदा केल्यांचे सांगीतले

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी सदर रेती टेंस्टींगचा रिपोर्ट कशाप्रकारे आला टेंस्टींग करिता रेती कोणती वापरली याबाबत माहितीची विचारना करून,सदर कामांची चौकशी सन्मा.सदस्य आरोग्य समिती यांचे समक्ष करून सभागृहांत अहवाल सादर करण्यांचे निर्देश शा.अ बा.वि.क्र २ याना दिले.

तसेच सन्मा.सदस्यांनी ,प्रा.आ.केंद्र सोनदाभी येथील वाहन प्रा.आ.केंद्र थेरडी येथे वापरण्यांस दिली.तेंव्हा त्या ठिकाणी टेंडर काढुन तेथे वाहन पुरविण्यां बाबत कार्यवाही करावी अशी माहिती सभागृहांत दिली तसेच प्रा.आ.केंद्र थेरडी येथील वाहन बंद आहे सदर गाडीचे चेसिंस क्रॅक आहे तरी सदर गाडी त्वरीत दुरूस्त करून देण्याबाबत विभागानी कार्यवाही करावी अशी माहिती सभागृहांत दिली.

यावर सचिव तथा अति. जिआअ यांनी वाहना बाबत टेंडर काढण्यांची परवानगी नसल्यांचे सांगुन जिल्हयांत एकुण ४ प्रा.आ.केंद्राचे ठिकाणी रूग्णवाहिका उपलब्ध करून देण्याबाबत मा.संचालक आरोग्य सेवा मुंबई यांचे कडे मागणी करण्यांत येईल असे सांगीतले. त्याचप्रमाणे उपकेंद्र पांढुर्णा ता. उमरखेड येथील बांधकामा बाबत आरोग्य विभागांनी व बा.वि. क्रं.२यांनी आद्याप पावेतो कोणतीच कार्यवाही केली नाही असे सांगुन त्याबाबत कार्यवाहीची मागणी केली.

यावर मा.सभापती आरोग्य समिती यांनी, उपरोक्त प्रकरणी त्वरीत कार्यवाहीचे निर्देश संबधीत विभागांस दिले. .

३) <u>सन्मा. सौ.ज्योतीताई जि. ठेंगे :–</u> यांनी उपकेंद्र खरबी येथील हस्तांतरणा बाबत विचारणा करून उपकेंद्र धनज ता. उमरखेड हे हस्तांतरीत झाले काय. झाले असल्यांस हस्तांतरण कोणत्या अटीवर झाले व सदर कामाचे देयक सुध्दा काढलेले आहे अशी माहिती दिली.यावर सदर उपकेंद्राचे हस्तांतरण हे अटीवर झाल्यांचे शा.अ बा. वि. क्रमांक २ यांनी सांगीतले

यावर प्रतिनिधी ता.आ.अ उमरखेड यांनी बांधकामांत ज्या काही त्रृटि आहेत त्यांसबधी उपअभियंता उपविभाग उमरखेड यांना त्रृटि पुर्ततेबाबत पत्र दिल्यांचे सांगुन त्याबाबत कोणतीच कार्यवाही केली नसल्यांचे सांगीतले. तसेच दराटी व चातारी येथील नैसर्गीक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानी बाबत कार्यवाही करावी केलेल्या कामांत ब–याच त्रृटि आहे व बरेच काम बाकी असल्यांचे सांगींतले.

यावर मा.सभापती आरोग्य समिती यांनी उपकेंद्र धनज ता.उमरखेड हे काम कोणी केले आहे याबाबत चौकशी करून सदर कामाची त्वरीत दुरूस्ती करण्यांत यावी असे निर्देश शा.अ बा.वि. क्र. २यांना दिले

तसेच सन्मा. सदस्यांनी पार्डी व पिरंजी उपकेंद्राचे विद्युत पुरवठयांचे काम झाले नाही विद्युत मिटर सुध्दा बसविले नाही.पि.डी बाबत कोणतीच कार्यवाही केली नाही.सदर प्रकरणी पैसे भरून मिटर लावण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी असे सांगीतले असता शा.अ.(विद्युत) बा. वि. क्रं.१ यांनी सदर प्रकरणी आंठ दिवसांत कार्यवाही करतो असे सांगीतले..

४) <u>सन्मा.श्री.प्रभाकर रा.उईके</u> :– यांनी उपकेंद्र घोंडखिंडी (प्राआकेंद्र अकोला (बा) येथील पेव्हींग ब्लॉक /सौंदर्यीकरण/सि.सि.रोड इत्यादी कामे करण्यांत यावी अशी माहिती सभागृहांत देउन कार्यवाहीची मागणी केली.

यांवर मा.सभापती आरोग्य समिती यांनी सदर प्रकरणी त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश शा.अ. बा. वि.क्रमांक १यांना दिले.

५) <u>सन्मा.श्री.पंढरी ह.सिंहे</u> :– यांनी उपकेंद्र चिखली, भांडेगांव येथील निर्लेखन करण्याबाबत कोणतीच कार्यवाही अद्यापपावेतो केलेली नाही अशी माहिती सभागृहांत देउन कार्यवाहीची मागणी केली.

यावर त्वरीत कार्यवाही करण्यांचे निर्देश मा.सभापती आरोग्य समिती यांनी शा.अ.बा.वि. क्र २यांना दिले.

६) <u>मा.सभापती आरोग्य समिती</u> :– यांनी प्रा.आ.केंद्र बेलोरा येथील निर्लेखनांचे काम ८दिवसांचे आंत पुर्ण करण्यांत यावे असे सुचित करून, उपकेंद्र गवारा
ता.मारेगांव येथील बांधकाम त्वरीत पुर्ण करण्यांत यावे असे आरोग्य विभागांस व शा.अ.बा. वि.क्रमांक १यांना निर्देश दिले.

तसेच प्रा.आ.केंद्र वेगांव येथील काम त्वरीत सुरू करण्यांत यावे व.वेगांव येथील अतिक्रमण हटविण्यांबाबत विभागाने कोणती कार्यवाही केली अशी विचारणा करून त्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश शा.अ बा. वि. क्रमांक १ यांना दिले.

त्याचप्रमाणे मा.सभापती आरोग्य समिती यांनी आतापर्यंत किती पिएम केंद्र सुरू झाले याबाबत माहिती विचारून, प्रा.आ.केंद्र शिरपुर येथे पिएम केंद्रा करिता विद्युत /पाणी/दुरूस्ती /रॅम ची सुविधा उपलब्ध करून देण्यांत यावी तसेच पिएम केंद्र त्वरीत दुरूस्त करून कार्यान्वीत होण्याबाबत आरोग्य विभाग व बांधकाम विभाग क्रं.१ व २ यांनी त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

यावर उपस्थित ता.आ.अ यांनी पिएम केंद्र दुरूस्ती केल्या शिवाय सुरू करता येणार असे सांगुन ग्रामिण रूग्णांलयाचे पॅटर्न प्रमाणे कार्यवाही करावी अशी सभागृहांत विनंती केली.

यांवर मा.सभापती आरोग्य समिती यांनी सदर प्रकरणी कार्यवाहीचे निर्देश शा.अ बा. वि. क्रमांक १व २यांना दिले.

मा सभापती आरोग्य समिती :—यांनी पुसद तालुक्यांतील उपकेंद्राचा आढावा घेतला असता ता.आ.अ पुसद यांनी १९ उपकेंद्राचे कामापैकी १७ कामे पुर्ण केले ७ उपकेंद्र ताब्यांत घेतले १० उपकेंद्र ताब्यांत घ्यावयाचे असे सांगीतले उपरोक्त प्रकरणी सर्व माहिती देण्यांत यावी व बाकी कामे त्वरीत पुर्ण करून हस्तातरणांची कार्यवाही करावी असे निर्देश शा.अ क्र. २यांना दिले.

मा.सभापती आरोग्य समिती यांनी खैरी ता.राळेगांव येथे वैद्यकिय अधिकारी देणे बाबत चा मुद्या उपस्थित करून त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश आरोग्य विभागांस दिले.

तसेच उपकेंद्र घोटी ता.कळंब येथील जागे बाबतचा मुद्या उपस्थित केला असता ता.आ.अ कळंब यांनी, सरंपच/सचिव ग्रा.प घोटी हे उपकेंद्रा करिता जागा देण्यांस तयार नसल्यांचे सांगीतले

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी सदर ठिकाणी जागा, ग्रा.प उपलब्ध करून देत नसेल तर तसे ग्रा.प कडुन लेखी स्वरूपांत घ्यावे व लेखी स्वरूपांत देत नसेल तर सदर उपकेंद्राची जागा हि लगतच्या दुस—या गांवात चापर्डा येथे स्थलांतरीत करण्यांबाबत कार्यवाही करावी व याकरिता सन्मा. सदस्य सौ. निलीमाताई म.गोहणे सदस्य आरोग्य समिती यांचे सहकार्य/मागदर्शन घ्यावे.व त्याबाबत तसे सन्मा सदस्यांना अवगत करावे असे निर्देश ताआअ कळंब यांना दिले.

७) सन्मा. श्री. प्रविण बा. उईके :—यांनी आयुर्वेदिक दवाखानां भांब येथील बांधकामाचा प्रस्तांव अद्यापपावेतो ता.आ.अ यवतमाळ यांनी आरोग्य विभागांस सादर केला नाही अशी माहिती सभागृहांत दिली.

यावर मा.सभापती आरोग्य समिती यांनी सदर प्रस्तांव आरोग्य विभागांस सादर करण्यांची जबाबदारी ही ता.आ.अ यवतमाळ यांची असतांना सुध्दा त्यांनी सादर केलेला नाही त्यामुळे सदर प्रस्तांव आरोग्य विभागांस सादर करण्यांची जबाबदारी ता.आ.अ यवतमाळ यांचे कडे देण्याबाबत सचिव तथा अति. जिआअ यांना निर्देश दिले. यावर सचिव तथा अति.जिआअ यांनी तसा प्रस्तांव सादर करण्या बाबत ता.आ.अ यवतमाळ यांना तशी जबाबदारी देउन त्यासंबधी त्वरीत कार्यवाही करावी असे ता.आ.अ यवतमाळ यांना सुचित केले.

तसेच प्रा.आ.केंद्र बेलोरा ता. यवतमाळ येथे पिएम केंद्राच्या प्रस्तांवा बाबत ता.आ.अ यवतमाळ यांनी पाठपुरावा करावा असे मा. सभापती आरोग्य समिती यांनी निर्देश दिले. .

८) सन्मा. सौ.प्राजक्ताताई नि.मानकर :—यांनी करंजी (रोड) येथील ॲम्बुलन्स दोन वर्षापासुन अपघातामुळे नादुरूस्त आहे. तेंव्हा सदर गाडी दुरूस्त करण्यांत यावी किंवा पर्यायी व्यवस्था म्हणुन दुस—या वाहनांची व्यवस्था करावी अशी माहिती सभागृहांस देउन कार्यवाहीची मागणी केली.

तसेच करंजी( रोड) येथील ग्रामिण रूग्णांलयांत ३ वै.अ असुन सुध्दा एकही वै.अ हे मुख्यालयी राहुन ग्रामिण भागांतील जनतेस आरोग्य सेवा उपलब्ध करून देत नाही अशी माहिती सभागृहांस सादर करून ,सदर ठिकाणी वै.अ मुख्यालयी राहुन जनतेस वेळीच आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याबाबत कार्यवाहीची मागणी केली.

यावर मा.सभापती आरोग्य समिती यांनी सदर प्रकरणी कार्यवाहीचे निर्देश डॉ.पांडे निवासी वै.अ सामान्य रूग्णांलय यांना दिले.

(९) सभागृहांत सन्मा.सौ.सुलोचनाताई मो. भोयर :—यांनी प्रा.आ.उपकेंद्र नेर क्रमांक १ व २ येथील एएनएम हया शहरी भागांत काम करतात व पगार मात्र जि.प.मधुन घेतात त्यामुळे सदर एएनएम यांना जि.प.चे आरोग्य विभागा अंतर्गत उपकेंद्र उमरठा व पिपळगांव (डुब्बा) येथे पदस्थापना करण्याबाबत आरोग्य विभागांनी कार्यवाही करावी असे सांगीतले.असता यावर सचिव तथा अति.जि.आ.अ यांनी तसा प्रस्तांव ता.आ.अ नेर यांनी आरोग्य विभागांस सादर करावा त्यानंतरच त्या बाबत कार्यवाही करण्यांत येईल अशी माहिती सभागृहांस दिली.

यावर सभागृहांत सविस्तर चर्चा करण्यांत येउन मा.अध्यक्षांनी खालील प्रमाणे ठरांव मांडला

ठरांव क्रमांक १:—उपकेंद्र नेर क्रमांक १ व २ येंथील एनएमची पदस्थापना रद्द करण्यात येउन नेर उपकेंद्र क्र. १व२येथील एएनएम यांची पदस्थापना मौजे उपकेंद्र उमरठा व पिंपळगांव येथे करण्यात यावी व सदर प्रकरणा बाबतशासनाकडे पाठपुरावा करण्या बाबत आरोग्य विषयक समिती हि मान्यता प्रदान करते.

ठरांवावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला.

सुचक :— सन्मा. सौ.सुलोचनाताई मो. भोयर

अनुमोदन — सन्मा. श्री.पंढरी ह. सिंहे

(१०) सभागृहांत आरोग्य विभागांतील कामकाजाचे आढाव्यांवर चर्चा होत असतांना सचिव तथा अति.जि.आ.अ यांनी,आरोग्य विभागांतील बरीच महत्वाची पदे रिक्त असल्यांचे सांगीतले .जसे (१) अति जिल्हा आरोग्य अधिकारी वर्ग—१ (२)जिल्हा माता बाल संगोंपन अधिकारी वर्ग—१ (३) जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी वर्ग—२ (४) प्रशासकिय अधिकारी वर्ग—२ (सदर पद हे मागील २० वर्षापासुन रिक्त आहे) तसेच मा. आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांचे कार्यालयांत श्री.आर.डी.शिंगणे वरिष्ठ.सहायक.हे मागील दोन वर्षापासुन प्रतिनियुक्तीवर असल्यांने सदर पदाचा अति. प्रभार कनिष्ठ. सहायक. यांचे कडे सोपविण्यांत आला आहे..

तसेच जिल्हास्थरावरील पदे लखुलेखक वर्ग—३ चे—१पद व कनिष्ठ सहायक १पद अशी महत्वाची पदे रिक्त असल्यामुळे आरोग्य विभागांचे कामकाज करण्यांस ब—याच अडचणी निर्माण झालेल्या आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाज प्रभावित झालेले आहे. तेंव्हा रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्यांत यावी अशी माहिती सभागृहांत दिली.

यावर सभागृहांत उपस्थित असलेले सन्मा. सदस्य व मा.सभापती आरोग्य समिती यांनी सविस्तर चर्चा करून खालील प्रमाणे ठरांव मांडला.

ठराव कमांक २ :—आरोग्य विभागांतील,शासनस्थरावरील अति.जिल्हा आरोग्य अधिकारी वर्ग—१(२) जिल्हा माता बाल संगोंपन अधिकारी वर्ग—१ (३) जिल्हा विस्तार व माध्यम अधिकारी वर्ग—२ (४) प्रशासकिय अधिकारी वर्ग—२ (सदर पद हे मागील २० वर्षापासुन रिक्त आहे) .सदर पदे हि शासनाकडुन नियुक्त होत असल्यांने सदर पदे त्वरीत भरणे बाबत व त्याकरिता शासनाकडे पाठपुरावा करण्याकरिता तसेच जिल्हा स्थरावरील पदे जसे लखुलेखक वर्ग—३चे १ पद व कनिष्ठ सहायक चे १पद अशी महत्वाची पदे रिक्त आहे त्याचप्रमाणे आरोग्य विभाग जि.प यवतमाळ येथील श्री.आर.डी.शिंगणे व.सहायक.हे मा.आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांचे कार्यालयांत प्रतिनियुक्तीवर (मागील२ वर्षापासुन) असल्यांने सदर पदाचा अति. प्रभार क. स. यांचे कडे सोपविण्यांत आला आहे उपरोक्त पदे रिक्त असल्यामुळे आरोग्य विभागातील कामकाज सुरळीत पणे पार पाडण्यांस ब—याच अडचणी निर्माण झालेल्या आहे. त्यामुळे कार्यालयीन कामकाज प्रभावित झालेले आहे. तेंव्हा रिक्त असलेली पदे त्वरीत भरण्यांत यावी अशी विनंती शासनाकडे करण्याकरिता हि आरोग्य विषयक समिती शिफारशीस्तव मान्यता प्रदान करते.

ठरांववर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला.

सुचक :— सन्मा. श्री.शिवशंकर श्रा. पांढरे

अनुमोदन — सन्मा. सौ.ज्योतीताई जि. ठेंगे

(११) सभागृहांत जिल्हयांतील, यवतमाळ तालुक्यांतील प्रा.आ.केंद्र हिवरी व बाभुळगांव तालुक्यांतील घारफळ येथील गळती प्रकरणी चर्चा होत असतांना, उपअभियंता यवतमाळ यांनी सदर प्रा.आ.केंद्राचे गळती दुरूस्तीचे काम केल्यांचे सांगीतले असता ता.आ.अ यवतमाळ व बाभुळगांव यांनी अशी कोणतीच दुरूस्ती केली नसल्यांचे सांगुन त्वरीत दुरूस्ती करण्यांची मागणी केली यावर सभागृहांत उपस्थित सन्मा. सदस्य व मा. सभापती आरोग्य समिती यांनी या प्रकरणी आरोग्य समितीचा ठरांव घ्यावा असे सुचित करून खालील प्रमाणे ठरांव मांडला.

ठरांव कमांक ३:–. प्राआकेंद्र हिवरी व बाभुळगांव तालुक्यांतील घारफळ येथील गळती प्रकरणी का.अ. बा. विभाग कमांक १व २ यांनी सदर प्रा.आ.केंद्राचे गळती बाबत पाहणी करून त्याबाबत दुरूस्तीचे काम त्वरीत करण्यांची कार्यवाही करण्याबाबत आजची आरोग्य विषयक समिती हि मान्यता प्रदान करते.

ठरांवावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला

सुचक :– सन्मा. श्री.प्रभाकर रा.उईके

अनुमोदन – सन्मा. सौ.प्राजक्ताताई नि. मानकर

वरील सर्व प्रकरणी कार्यवाहीचे निर्देश देउन मा. अध्यक्ष यांनी खालील प्रमाणे ठरांव माडला

ठराव क. ४– दिनांक २३./१२/२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्यांस मंजुरी देण्यात आली. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क.२ शासन परिपत्रकाचे वाचन करणे.

सचिव तथा अति.जिआअ यांनी, शासनाकडुन आरोग्य विभागा अंतर्गत शासन परिपत्रक ,शासन निर्णय प्राप्त झाले नाही अशी माहिती दिली.

विषय क. ३ :–माहे नोंव्हेबर–१४ अखेरपावेतो कुटुंब कल्याण कार्यकमा अतंर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे. सदर कार्याची माहिती सचिव तथा अति.जि.आ.अ. यांनी खालील प्रमाणे सादर केली.

| अ.क | विवरण | वार्षिक लक्ष | मासिक कार्य | प्रगतीपर कार्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कु.क.शस्त्रक्रिया | १५७३९ | २१४६ | ६९४४ | ४४ |
| २ | तांबी | १०५५९ | ६०७ | ४७७२ | ४५ |
| ३ | गर्भनिरोधक गोळया | ९३४९ | १५९ | ११०७ | १२ |
| ४ | निरोध (युझर्स) | ०० | ५९ | ५७९ | ०० |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन .मा. अध्यक्ष, यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क. ५ :– माहे नोंव्हेबर–१४ अखेरपावेतो कुटुंब कल्याण कार्यकमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क.४ :– माहे नोंव्हेबर–१४ अखेरपावेतो माताबाल संगोपन व सार्वत्रिक लसीकरण कार्यकमा अतंर्गत कार्याचा आढावा घेणे. सदर कार्याची माहिती सचिव तथा.अति जि.आ.अ.यांनी खालील प्रमाणे सादर केली.

| अ.क. | विवरण | वार्षिक लक्ष | मासिक कार्य | प्रगतीपर कार्य | टक्के. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डि.पी.टी. | ४४७६२ | ३५८२ | २८६२४ | ६४ |
| २ | पोलीओ | ४४७६२ | ३५५२ | २८५७५ | ६४ |
| ३ | मिझल्स | ४४७६२ | ३०८० | २८३३६ | ६३ |
| ४ | बि.सी.जी. | ४४७६२ | ४८६१ | ३०७१७ | ६९ |
| ५ | काविळलस | ४४७६२ | ३७६९ | २८२७८ | ६३ |
| ६ | टि.टि.गरोदर माता | ४९२३८ | ३००९ | २४६२७ | ५० |
| ७ | एफ.एस.मोठया गोळया | ४९२३८ | ४५२४ | ३६८०३ | ७४ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ८ | एफ.एस. लहान गोळया | २१६६८० | २४५२ | १४१५५ | ७ |
| ९ | व्हिटॅमिन अ ५वा डोज | ४५६६१ | १४९४ | १६७८१ | ३७ |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होवुन मा.अध्यक्ष, यांनी खालील ठराव मांडला

ठराव क्र.६– माहे नोंव्हेबर–१४ अखेरपावेतो माताबाल संगोपन व सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.५ :– माहे नोंव्हेबर–१४ अखेरपावेतो क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअतर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती प्रभारी जि.क्ष.अ यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अ.क्र. | विवरण | नार्मप्रतिलक्ष लोकसंख्या | वार्षिक अपे.साध्य | मासिक अपे.उदिष्टये | माहे नोंव्हे–१४ | प्रगतीपर | टक्के | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नविनथुंकी दुषितरूग्णशोधणे | ५६प्रतिलक्ष लोकसंख्या | २३०८ | १९२ | ८४ | ७१७ | – | |
| २ | नविन थुंकी अदुषित रूग्ण शोधणे | ५६प्रतिलक्ष लोकसंख्या | २३०८ | १९२ | ७८ | ४८० | – | |
| ३ | जुने रिट्रीटमेंट केसेस | २८प्रतिलक्ष लोकसंख्या | ११५५ | ९६ | ५६ | ३९१ | – | |
| ४ | फुफुसेत्तर क्षयरूग्ण | ११प्रतिलक्ष लोकसंख्य | ४६२ | ३९ | ४१ | ४०१ | – | |
| ५ | एकुण क्षयरूग्ण | २८दशलक्ष लोकसंख्या | ६२३३ | ५१९ | २५९ | १९९२ | – | |
| | | कॅट –१ | – | – | २०३ | १६०१ | – | |
| | | कॅट –२ | – | – | ५६ | ३९१ | – | |
| | | एकुण | – | – | २५९ | १९९२ | – | – |
| | | थुंकी दुषीत | – | – | १२० | ९७२ | – | – |
| | | थुंकी अदुषित | – | – | ९८ | ६१९ | – | – |
| | | फुफुसेत्तर | – | – | ४१ | ४०१ | – | – |
| | | एकुण | – | – | २५९ | १९९२ | – | – |
| १ | उपचारामुळे बरे झालेले क्षयरूग्ण | ८५टक्केपेक्षा जास्त | – | – | ३५३ पैकी २८५ | ८१(टक्के) | | – |
| २ | मृत्यु झालेले क्षयरूग्ण | ५ टक्केपेक्षा कमी | – | – | ३५३ पैकी २२ | ०६(टक्के | | – |
| ३ | उपचार सोडलेले क्षयरूग्ण | ५ टक्केपेक्षा कमी | – | – | ३५३पैकी १८ | ५( टक्के) | – | – |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन .मा. अध्यक्ष, यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क्र. ७:– माहे नोंव्हेबर–१४ अखेरपावेतो क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते.ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

विषय क्र.६ :— माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो हिवताप नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्याचा आढावा घेणे. सदर कार्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अक्र. | विवरण | वार्षिक लक्ष | मसिक कार्य | प्रगतीपरकार्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | घरोघरी घेतलेले रक्तनमुने | २३३१४० | ३७१४९ | २४७४७६ | १५९ |
| २ | दवाखान्यात घेतलेले रक्तनमुने | ९९९१६ | २२०६५ | १५२३५६ | २२० |
| ३ | सामुदायीक घेतलेले रक्तनमुने | ०० | ५६२ | २६६० | ०० |
| ४ | एकुण बेरीज | ३३३०५६ | ५९७७६ | ४३९६४१ | १७९ |
| ५ | आढळलेले दुषित रक्तनमुने | ०० | ६४ | ४१७ | ०० |
| ६ | समुळ उपचार घेणारे रूग्ण | ०० | ६४ | ४१७ | ०० |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन .मा. अध्यक्ष, यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क्र. ८— माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो हिवताप नियंत्रण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.७— माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रमा अंतर्गत कार्याचा आढावा घेणे. सदर कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रमा अंतर्गत कार्याची माहिती सहायक संचालक (कुष्ठरोग)यवतमाळ यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अ.क्र. | दर्शक मुदयाचें नांव | मासीक | प्रगतिपर | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | शोधलेले नविन कुष्ठरूग्ण | ३१ | २७१ | १४.७९ |
| २ | नविन कुष्ठरूग्णामध्ये स्त्रीया | १२ | १२४ | ४६ |
| ३ | नविन कुष्ठरूग्णामध्ये सांस.रूग्ण | १५ | १३२ | ४९ |
| ४ | नविन कुष्ठरूग्णामध्ये मुलांची संख्या | १ | १३ | ५ |
| ५ | नविन कुष्ठरूग्णामध्ये विकतीचे रूग्ण | ० | १० | ३.६९ |
| ६ | अनुसुचित जातीचे नविन कुष्ठरूग्ण | २ | ४४ | १५ |
| ७ | अनुसुचित जमातीचे नविन कुष्ठरूग्ण | १३ | ७० | १२.४४ |
| ८ | औषधोपचार मुक्त झालेले रूग्ण | ४२ | २९२ | .० |
| ९ | विविध कारणांनी कमी झालेले रूग्ण | ० | ९ | ० |
| १० | महिनाअखेर एकुण क्रियाशील रूग्ण | ०० | २७३ | ० |
| ११ | कुष्ठरूग्ण अस्तित्व दर (पी.आर) | ०० | ०० | ०.९४ |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन.मा. अध्यक्ष,आरोग्य समिती यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क्र. ९:— माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो कुष्ठरोग निर्मुलन कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

विषय क्र. ८ :—माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो नेंत्रशस्त्रक्रीया कार्यक्रमा अंतर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती नेत्र चिकित्सक अधिकारी ,अंधत्व निवारण संस्था यांनी खालील प्रमाणे सादर केली अंधत्व निवारण कार्यक्रमातंर्गत जिल्हयाला २०१४—१५ या वर्षात ५०२५ चे लक्ष देण्यात आले होते. त्यानुसार माहे नोंव्हेबर—१४ मध्ये ६०४मोतिबिंदु शस्त्रक्रीया करण्यात आल्या.माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो प्रगतीपर २८५८ असून त्याची टक्केवारी ५७ आहे. अशी माहिती ने.चि.अधिकारी यांनी दिली

विषय क्र. ९ :—माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो पाणी शुध्दीकरण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती, मुख्य अणुजीव शास्त्रज्ञ जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा यांनी खालील प्रमाणे सादर केली माहे नोंव्हेबर—१४ मध्ये अणुजीव तपासणी करीता २११८पाणीनमुने घेण्यात आले त्यापैकी २५०पाणीनमुने दुषित आढळले त्याची टक्केवारी १२ ही आहे. त्याच प्रमाणे माहे नोंव्हेबर—१४ मध्ये ब्लिचिंग

पावडरचे ३३४नमुने घेण्यात आले त्यापैकी३९नमुने २० टक्कयापेक्षा कमी क्लोरीन असल्याचे आढळले त्याची टक्केवारी १२ ही आहे.

विषय क्र १०:—यवतमाळ जिल्हयांतील मुलीचे लिंग प्रमाण वाढ करणे बाबत

सदर विषयांची माहिती प्रतिनिधी सि.एस कार्यालय यांनी,खालील प्रमाणे सादर केली की, माहे नोंव्हेबर—१४ मध्ये तालुका झरीजामणी मध्ये जन्म लिंग गुणोत्तर ( १००० पुरूष जन्मामागे स्त्रिजन्माचे प्रमाण ) प्रमाण हे ११४३ एवढे आहे सदर प्रमाण हे जिल्हयांतील इतर तालुक्यापेक्षा जास्त आहे तद्वतच त्यापाठोपाठ येथील तालुक्यातील स्त्रिजन्माचे प्रमाणे हे पुरूष जन्माचे प्रमाण पेक्षा जास्त आहे. त्यामुळे सदर तालुक्यांचे काम अंत्यत चागले आहे.

तसेचयवतमाळ/वणी/उमरखेड/पुसद/पांढरकवडा/नेर/मारेगांव/दिग्रस/दारव्हा/बाभुळगांव/आर्णी या तालुक्यांत पुरूषांचे जन्मांचे तुलनेत स्त्रिजन्मांचे प्रमाण फारच कमी आहे.स्त्रिजन्मांचे प्रमाण वाढविण्याकरिता सदर तालुक्यांनी जास्त प्रयत्न करणे आवश्यक आहे .सदर कार्यक्रमाअंतर्गत स्त्रिजन्माचे प्रमाणांत वाढ करण्यांबाबत प्रयत्न करणे आवश्यक असल्यांचे सांगुन मा. अध्यक्ष यांनी जिल्हयांतील मुलींचे लिंग प्रमाण वाढ करण्यांबाबत ग्रामिण भागांतील जनतेत जनजागृती करणे अतिशय आवश्यक आहे जनजागृती करण्यांचे दृष्टीने विभागांने दक्षता घ्यावी असे सभागृहात प्रतिपादन केले. तसेच ज्या तालुक्यांत सेक्स रेशो मध्ये पुरूष जन्माचे तुंलनेत स्त्रिजन्माचे प्रमाण हे फारच कमी आहे. सदर प्रमाण वाढविण्या बाबत कार्यवाही करावी असे निर्देश मा.अध्यक्ष यांनी उपस्थित सर्व ता.आ.अ यांना दिले.

यावर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन चर्चा होउन मा. अध्यक्षांनी खालील ठरांव मांडला

ठरांव क्र १०—यवतमाळ जिल्हयांतील मुलींचे लिंग प्रमाण वाढ करणे बाबतचे आढाव्यांस हि सभा सर्वानुमते मंजुरात देते व ठरांवावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला.

विषय क्र. ११:— माहे नोंव्हेबर—१४ अखेर पावेतो सिकलसेल कार्यक्रमा अंतर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्यक्रमा अंतर्गत झालेल्या कार्याची माहिती जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक एनआरएचएम आरोग्य विभाग यांनी.माहे नोंव्हेबर—१४ मध्ये एकुण जिल्हयांला महिण्यांचे २५००उध्दिठ असुन सोल्युबीलीटी टेस्ट केलेल्या व्यक्तींची संख्या १६१४आहे.त्यामध्ये सोल्युबीलीटी टेस्ट सकारात्मक असलेल्या व्यक्तीची संख्या १०८एवढी आहे.तसेच इलेक्ट्रोफोरसीस टेस्ट करिता पाठवलेलया रक्त नमुन्यांची सख्या १०८ आहे. सदर तपासणी मध्ये वाहक ७३ ,रूग्ण ६,नकारात्मक २९ आहे. एकुण कार्डवाटपा मध्ये लाल कार्ड ६,पिवळे कार्ड ७३व पांढरे कार्ड १५३५ आहेत.अशी माहिती सभागृहांस सादर केली. सदर कार्याच्या आढाव्यावंर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन खालील प्रमाणे ठरांव मांडला

ठराव क्र. ११:— माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो सिकलसेल कार्यक्रमाच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.१२:—आरोग्य विभागां अतर्गत नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो झालेल्या बांधकामाच्या कार्याचा आढावा घेणे.

माहे नोंव्हेबर—१४ अखेरपावेतो आरोग्य विभागांतर्गत झालेल्या प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र बांधकाम व दुरूस्तीच्या कार्याची माहिती शा.अ.बांधकाम विभाग क्र.१ व २ यांनी आपआपल्या विभागांतील बांधकामाचा आढावा सभागृहात सादर केला.यामध्ये प्रा.आ. केंद्रे/उपकेंद्रा मधील किती कामे पुर्ण झालेली आहे व किती कामे प्रगतीपथावर आहे तसेच काही ठिकाणी जागा उपलब्ध न झाल्यामुळे जागा उपलब्ध होतांच नविन बांधकामे हाती घेण्यांत येईल त्याचप्रमाणे जी बांधकामे पुर्ण झालेली आहे त्या कामांस आरोग्य विभागांस हस्तांतरीत केल्यांचे सांगीतले.व काही किरकोळ कामे बाकी असल्यामुळे, त्वरीत आरोग्य विभागांस हस्तांतरीत करण्यांची कार्यवाही करण्यांत येईल अशी माहिती शा.अ बा. वि. क्र १ व २ यांनी सभागृहांत सादर केली.यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी वरील सर्व कामा बाबत निर्देश देउन बांधकामाअंतर्गत केल्या जाणा—या कामाची गुणवत्ता चांगल्या दर्जाची राहील याकडे अधिक लक्ष देण्यांची गरज असल्यांचे प्रतिपादन केले.

विषय क्रमांक १३ :– कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १ व २ यांचे कडुन प्राप्त झालेल्या बांधकामाचे प्राकलनांस मंजुरात मिळणे बाबात

सचिव तथा अति.जिआअ यांनी, कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १ व २ यानी त्यांचे संदर्भीय पत्र क्रमांक

१)का.अ यजिप/बांध–१ताशा–२/१४/याचे जापत्र क्रमांक ३०१९ दि.१६.१२.२०१४ (२) का.अ यजिप/बांध–१ताशा–२/१४/याचेजापत्र क्रमांक ३७६८

दि.१५.१२.२०१४ अन्वये प्राप्त झालेले ३ प्राकलने प्रशासकिय मंजुरीस्तव आरोग्य समिती समोर सादर करण्या करिता हया कार्यालयातील नियोजन शाखेस कळविण्यांत आलें त्यानुसार सदर विषय आरोग्य समिती समोंर सादर करण्यांत येत आहे.अशी माहिती सभागृहांस सादर केली.

| अ.कं | तपशिल | रक्कम | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा.आ.केंद्र शिबला ता. झरी येथील मुख्य इमारतीचे किरकोळ दुरूस्ती व रंगरगोंटी करणे | ९९,०००/– | आदीवासी | वै.अ अहवाल अप्राप्त |
| २ | प्रा.आ.केंद्र रामपुर ता.घांटजी येथील मुख्य इमारतीची दुरूस्ती करणे | १८,१८०००/– | आदीवासी | वै.अ अहवाल अप्राप्त |
| ३ | प्रा.आ.उपकेंद्र उमरसरा ता. यवतमाळ अंतर्गत नाली व सिमेंट रोड बांधकाम | १५,००,०००:– | आदीवासी | वै.अ अहवाल अप्राप्त |

कार्यकारी अभियंता बांधकाम कं १ व २ यांनी, एकुण ३ प्राकलने प्रशासकिय मंजुरात प्राप्त करण्यांसाठी आरोग्य समिती समोर सादर केलेले आहे. उपरोक्त प्राकलनाची कामे मा. सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या दि. १८.८.२०११ चे मार्गदर्शक तत्वाच्या अधिन राहुन सभेने मंजुरात प्रदान करण्यांस हरकत नाही तसेच कॉंकिटीकरण ,प्लेवीगब्लॉक बसविणे इत्यादी कामे जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मान्यतेनेच करण्यांत यावे व मा. उपसंचालक आ.से अकोला मंडळ अकोला यांची परवानगी प्राप्त झाल्याशिवाय बांधकामाची कार्यवाही करण्यांत येउ नये तसेच प्रथम कामे मुख्य इमारत बांधकाम करावे व त्यानंतरच निधी उपलब्धतेच्या अटिच्या अधिन राहुन या कार्यालयांचे परवानगीनुसार कामे हाती घेण्यांत यावी. तसेच आवारभिर्तीचे बाहेर कोणतेही काम करता येणार नाही मार्गदर्शक तत्वानुसार दुरूस्तीची कामे वगळुन उपकेंद्र मुख्य इमारत बांधकामाची मा. संचालक आरोग्य सेवा संचालनालय मुबई यांच्या पुर्वपरवानगीसाठी व आवांरभित /संरक्षण भितींचे प्राकलन मा. उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ अकोला यांची पुर्वपरवानगी साठी पाठविण्यांत येईल त्यामुळे मुख्य इमारत बांधकाम व वॉलकम्पांड बांधकामाच्या कुठल्याही कामा बाबत मा. संचालक आरोग्य सेवा संचालनालय मुंबई व मा.उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ अकोला यांची परवानगी प्राप्त झाल्याशिवाय बांधकामाची कार्यवाही करण्यांत येउ नये व का.अ.बा.वि.कं १ व २ यांनी प्रशासकिय मान्यतेसाठी सादर केलेल्या पाकलनाच्या बाबतीत सदर काम आवश्यक आहे असा अभिप्राय सबधीत वै.अ यांचे कडुन अपाप्त आहे तसेच अ.कं ३ चे काम उपकेंद्र आवारांतील काम करण्याबाबत मार्गर्शक तत्वानुसार आदेशीत आहे उपकेंद्राच्या आवारा बाहेरील काम केंल्यांस सर्वस्वी जबाबदारी बांधकाम विभगांची राहील अशी माहिती सचिव तथा अति. जि.आ.अ यांनी सभागृहांत दिली.

वरील विषयावर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन मा,सभापती यांनी खालील ठरांव मांडला

ठरांव कमांक १२:— कार्यकारी अभियंता बा.वि.क १ व २ यांचे कडुन प्राप्त झालेल्या एकुण ३ प्राकलनास निधी उपलब्धतेला अधिन राहुन व शासनांचे मार्गदर्शक तत्वानुसार सदर समिती ही उपरोक्त बाबीला अनुसरून बांधकाम विभागांने सादर केलेल्या प्राकलनांस प्रशासकिय मान्यता प्रदान करित आहे तसेच सन २०१४—१५ या आर्थीक वर्षात प्राप्त होणा—या निधीच्या तसेच प्रथम कामे मुख्य इमारत बांधकाम करावे व त्यानंतरच निधी उपलब्धतेच्या अटिच्या अधिन राहुन या कार्यालयांचे परवानगीनुसार कामे हाती घेण्यांत यावी. या अटिवरच बांधकाम विभाग कं १व २ यांचे कडुन प्राप्त झालेल्या एकुण ३ प्राकलनास जिल्हा वार्षीक योजनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व निधी उपलब्धतेला अधिन राहुन ही सभा प्रशासकिय मंजुरात प्रदान करते ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय कमांक १४ :— कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग कमांक १ यांचे कडुन प्राप्त झालेल्या बांधकामाचे प्राकलनांस सुधारीत प्रशासकिय मान्यतेस शिफारशीस्तव मंजुरात मिळणे बाबात

सचिव तथा अति.जिआअ यांनी, सभागृहांत कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग कमांक १ यांचे पत्र कमांक का.अ यजिप/बांध—१ताशा—२/१४/याचे.जापत्र कमांक ३८५४ दि.१८.१२.२०१४ अन्वये प्रा.आ. उपकेंद्र गोडबुरांडा ता. मारेगांव येथील उपकेंद्र बांधकामाचे प्राकलन

रू.४७,६६,०००/— (बिगर आदीवसी क्षेत्र )चे सुधारीत प्रशासकिय मान्यतेस शिफारशी करिता स्थायी समिती सक्षम असल्यामुळे सदर विषय शिफारशीस्तव मंजुरात प्रदान करण्यास्तव आरोग्य समिती समोर सादर करण्यांत येत आहे.अशी माहिती सभागृहांत सादर केली.

यावर सभागृहांत सविस्तर चर्चा करण्यांत येउन मा. अध्यक्षांनी खालील ठरांव मांडला.

ठरांव कमांक १३:— उपकेंद्र गोडबुरांडा ता. मोरगांव येथील उपकेंद्र बांधकामाचे प्राकलन

रू.४७,६६,०००/— (बिगर आदीवासी क्षेत्र)चे सुधारीत प्रशासकिय मान्यतेस शिफारशी करिता स्थायी समिती सक्षम असल्यामुळे सदर विषयांस स्थायी समिती सभेची मंजुरात घेण्याकरिता आरोग्य वियक समिती ही शिफारशीस्तव मंजुरात प्रदान करते.

ठरांवावर कोणतीही उपसुचना आली नही वठराव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला.

विषय कमांक १५:— मा.अध्यक्ष यांचे पुर्वपरवानगीने वेळेवर येणारे ईतर विषय

मा.अध्यक्ष यांचे पुर्व परवानगीने सभागृहांत एकही विषय सादर करण्यांत आला नाही अशी माहिती सचिव तथा जिआअ यांनी दिली.

शेवटी उपस्थित सन्मा.सदस्य व अधिकारी यांनी सभेच्या कामकाजांस भाग घेउन सहकार्य केल्या बाबत उपस्थितांचे आभार मानुन मा. अध्यक्ष. यांचे परवानीने सभा संपल्यांचे सचिव तथा जिआअ यांनी जाहीर केले.

सचिव तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद, यवतमाळ

अध्यक्ष
आरोग्य व शिक्षण समिती
जिल्हा परिषद, यवतमाळ